Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। सोमवार, दि. ०६ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक ८८ । पाने २।
Title Code - T/MH/2026/0422/5204/1306
DIGITAL EDITION

**अतिवृष्टीमुळे पनवेल महापालिका अलर्ट!**
(पान २ वर)



» Selected

## नशिराबादमध्ये विकासकामांना वेग

नशिराबाद | नशिराबाद शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी नगरपंचायत प्रशासनाकडून विविध विकासकामांना वेग देण्यात आला असून, शहरातील अनेक भागांत रस्ते, प्रॉपर्टी चेंबर्स तसेच इतर मूलभूत सुविधा उभारण्याची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. या विकासकामांमुळे भविष्यात शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी सुधारणा होणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सध्या सुरू असलेल्या कामांमुळे तसेच पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर काही ठिकाणी रस्त्यांवर चिखल साचणे, वाहतुकीत अडथळे निर्माण होणे आणि नागरिकांना तात्पुरता त्रास सहन करावा लागत असल्याचे चित्र आहे. या अडचणींची दखल घेत नगराध्यक्ष योगेश नारायण पाटील यांनी नागरिकांना दिलासा देत या समस्या तात्पुरत्या स्वरूपाच्या असल्याचे सांगितले. नगराध्यक्ष पाटील म्हणाले की, शहराच्या दीर्घकालीन विकासासाठी ही कामे अत्यंत आवश्यक आहेत.

## उद्धव ठाकरेंचा भाजपवर जोरदार हल्लाबोल; गावागावांत रामरक्षा पठण करण्याचे आवाहन

# 'मंदिरातील चोरीप्रकरणी हिंदू माफ करणार नाही'

## दादरमधील राम मंदिरात अनोखे आंदोलन; अयोध्या प्रकरणाची निष्पक्ष चौकशीची मागणी

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई । अयोध्येतील राम मंदिरातील कथित चोरीप्रकरणाच्या निषेधार्थ शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी रविवारी मुंबईतील दादर येथील राम मंदिरात रामरक्षा पठण करून अनोखे आंदोलन केले. यानंतर उपस्थित शिवसैनिकांना संबोधित करताना त्यांनी केंद्रातील भाजप सरकारवर जोरदार टीका केली. "आम्ही कट्टर देशाभिमानी हिंदू आहोत.**

हिंदू भोळे आणि श्रद्धाळू आहेत, पण मूर्ख नाहीत. मंदिरांच्या नावावर जर लूट होत असेल, तर हिंदू आता माफ करणार नाही," असा इशारा त्यांनी दिला. राम मंदिर परिसरात शेकडो शिवसैनिक उपस्थित होते.



रामरक्षा पठणानंतर झालेल्या सभेत उद्धव ठाकरे यांनी राम मंदिर उभारणीसाठी शिवसैनिकांनी दिलेल्या योगदानाची आठवण करून दिली. "शिलापूजन, रथयात्रा आणि कारसेवेत शिवसैनिकांनी मोठे योगदान दिले. अनेकांनी त्यासाठी रक्त सांडले आणि बलिदान दिले. त्यानंतर मुंबईने दंगली आणि बॉम्बस्फोटांचा काळ पाहिला. त्या वेळी हिंदूंच्या पाठीशी ठामपणे उभे राहणारे एकमेव नेते म्हणजे हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे होते," असे ते म्हणाले. सध्याच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करताना त्यांनी शिवसेना फोडल्याचा आरोपही भाजपवर केला. "ज्यांच्यासाठी आम्ही मेहनत केली, ते सत्तेत आल्यानंतर कट्टर हिंदुत्ववादी शिवसेनेलाच संपवण्याचा प्रयत्न करू लागले. कारण शिवसेना ही सत्तेला थेट प्रश्न विचारणारी ताकद आहे.

असा दावा त्यांनी केला. अयोध्येतील कथित चोरीप्रकरणाचा उल्लेख करताना ठाकरे म्हणाले की, "देशभरातील भाविकांनी राम मंदिरासाठी उदारहस्ते देणग्या दिल्या. अनेकांनी दागिने, सोन्याचे दान अर्पण केले.

त्या देणग्यांचे काय झाले, याची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. चार दिवसांत चौकशी करून क्लीन चिट देण्याचा प्रयत्न होऊ नये." भाषणादरम्यान त्यांनी केदारनाथ, उज्जैन आणि बद्रीनाथसंदर्भातील कथित आर्थिक गैरव्यवहारांच्या आरोपांचाही उल्लेख करत सरकारवर निशाणा साधला. "धर्माच्या नावावर सत्ता मिळवून श्रद्धेचा गैरवापर होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे," अशी टीका त्यांनी केली. साधू-संतांच्या सुरक्षेच्या नावाखाली होणाऱ्या तपासण्यांवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. "साधू-महंत सांगतात की, मंदिरात प्रवेश करताना त्यांची लंगोटीही तपासली जाते. मात्र, मंदिरातील संपत्तीबाबत प्रश्न निर्माण होत असतील तर ते अत्यंत गंभीर आहे," असे ते म्हणाले.

### देशभर रामरक्षा पठणाचे आवाहन

देशातील हिंदूंना आवाहन करताना उद्धव ठाकरे म्हणाले, "ही केवळ आंदोलनाची सुरुवात आहे. महाराष्ट्रातून पेटलेली ही ठिणगी गावागावांत पोहोचली पाहिजे. जिथे राम मंदिर किंवा हनुमान मंदिर असेल, तिथे रामरक्षा पठण करा. श्रद्धेचा गैरवापर करणाऱ्यांविरोधात जनजागृती करणे ही काळाची गरज आहे." शेवटी त्यांनी हनुमानाच्या लंकेच्या दहनाचा संदर्भ देत, "आमच्याकडचे धनुष्य हिसकावले असेल, पण अन्यायाविरुद्ध लढण्याची मशाल आमच्या हातात आहे. अन्यायाची लंका जाळून खाक केल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही," असा निर्धार व्यक्त केला. त्यांच्या या भाषणानंतर राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

---

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## ममुराबाद ग्रामपंचायतीचा कारभार वाऱ्यावर?

### सोनार गल्लीतील रस्ता चिखलमय



**जन सम्राट टाईम्स**

**ममुराबाद | प्रतिनिधी:** ममुराबाद ग्रामपंचायत हद्दीतील सोनार गल्लीतील रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, पावसाळ्यात नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. रस्ता पूर्णपणे चिखलमय झाल्याने दुचाकीस्वार घसरून पडण्याच्या घटना घडत असून, पादचाऱ्यांनाही मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, पावसामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखल साचला असून वाहतूक धोकादायक बनली आहे. विशेषतः शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना या रस्त्यावरून ये-जा करताना मोठी कसरत करावी लागत आहे. रस्त्याच्या दुरवस्थेबरोबरच परिसरातील स्वच्छतेचाही प्रश्न गंभीर बनला आहे.

रस्त्याच्या कडेला कचऱ्याचे ढिगारे साचल्याने दुर्गंधी पसरत असून डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे संसर्गजन्य आजारांचा धोका वाढल्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. स्थानिक रहिवाशांनी अनेकवेळा ग्रामपंचायतीकडे रस्ता दुरुस्ती व स्वच्छतेची मागणी केली असल्याचा दावा केला आहे. मात्र, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती, पाण्याचा निचरा आणि स्वच्छता मोहीम राबवून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी सोनार गल्लीतील रहिवाशांनी केली आहे.

---

## तीन मजली इमारत कोसळली; ६ जणांचा दुर्दैवी मृत्यू, ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांचा शोध सुरू

### जनता नगरातील दुर्घटना; एनडीआरएफ, अग्निशमन दल व महापालिकेचे युद्धपातळीवर बचावकार्य

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई | प्रतिनिधी:** मुंबईतील मानखुर्द परिसरात रविवारी रात्री घडलेल्या भीषण दुर्घटनेने संपूर्ण शहर हादरले आहे. जनता नगर परिसरातील हनुमान मंदिराजवळील चाळ क्रमांक ५ मधील तीन मजली बांधकाम अचानक कोसळल्याने किमान ६ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून अनेक जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. घटनास्थळी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (NDRF), अग्निशमन दल, मुंबई महानगरपालिका, पोलीस आणि वैद्यकीय पथके युद्धपातळीवर बचावकार्य करत आहेत. ही दुर्घटना रविवारी (५ जुलै) रात्री सुमारे ८.३० वाजण्याच्या सुमारास घडली. इमारत कोसळताच परिसरात एकच गोंधळ उडाला. मोठा आवाज झाल्यानंतर स्थानिक नागरिक तातडीने मदतीसाठी धावले. त्यांनी प्राथमिक स्तरावर ढिगाऱ्याखाली अडकलेल्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने पोलीस आणि आपत्कालीन यंत्रणांना पाचारण करण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान, एनडीआरएफचे विशेष पथक, मुंबई महापालिकेचे अधिकारी आणि पोलीस मोठ्या संख्येने घटनास्थळी दाखल झाले. जेसीबी आणि अन्य अत्याधुनिक यंत्रसामग्रीच्या सहाय्याने ढिगारा हटविण्याचे काम सुरू करण्यात आले. बचाव पथक ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांचा शोध घेत असून प्रत्येक मिनिट महत्त्वाचा ठरत आहे. बचावकार्यादरम्यान गंभीर अवस्थेत बाहेर काढण्यात आलेल्या सहा जणांना तातडीने रुग्णवाहिकेतून मुंबईतील शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी सर्व सहा जणांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. शताब्दी रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी या मृत्यूची अधिकृत पुष्टी केली आहे. दरम्यान, मुंबईत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे बचावकार्यात मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. ढिगाऱ्यात पाणी साचणे, सतत पडणारा पाऊस आणि अरुंद परिसर यामुळे यंत्रणांना अत्यंत सावधगिरीने काम करावे लागत आहे. तरीही एनडीआरएफ आणि अग्निशमन दलाचे जवान जीवाची पर्वा न करता शोधमोहीम सुरू ठेवत आहेत. गेल्या काही दिवसांपासून मुंबईत मुसळधार पावसामुळे दुर्घटनांची मालिका सुरूच आहे. काही दिवसांपूर्वी चेंबूर येथे शाळेच्या बसवर झाड कोसळून एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला होता. अंधेरी येथे मॅनहोलमध्ये पडून एका वृद्धाचा मृत्यू झाला, तर कुर्ला आणि गोरेगावमध्ये झाड कोसळण्याच्या घटनाही घडल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर मानखुर्दमधील ही दुर्घटना अधिकच गंभीर मानली जात आहे. प्रशासनाने नागरिकांना दुर्घटनास्थळाजवळ गर्दी न करण्याचे आवाहन केले असून बचावकार्य पूर्ण होईपर्यंत परिसरात सुरक्षा व्यवस्था वाढविण्यात आली आहे.

---

## शाळेच्या वेळेत बदलासाठी शिक्षक सेनेची पालकमंत्री गुलाबराव पाटील यांची भेट

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव प्रतिनिधी:** शाळेच्या वेळेत करण्यात आलेल्या बदलामुळे निर्माण झालेल्या अडचणींच्या पार्श्वभूमीवर शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सेना, जळगाव यांच्या पदाधिकाऱ्यांनी जळगावचे पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांची भेट घेऊन शाळेची वेळ बदलण्याची मागणी केली. शिक्षण विभागाच्या अलीकडील पत्रानुसार शाळेची वेळ सकाळी ८.०० ते दुपारी २.०० अशी निश्चित करण्यात आली होती. ही वेळ शिक्षक, विद्यार्थी, पालक तसेच शालेय कामकाजासाठी गैरसोयीची



असल्याचे संघटनेने पालकमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. यावेळी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सेनेच्या महिला व पुरुष पदाधिकाऱ्यांनी SIR आणि BLO यांसारख्या निवडणूक विषयक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी शाळेची वेळ इतर जिल्ह्यांप्रमाणे सकाळची ठेवण्याची विनंती केली. या मागणीची गंभीर दखल घेत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी तत्काळ शिक्षणाधिकाऱ्यांशी दूरध्वनीवर संपर्क साधून इतर जिल्ह्यांमध्ये लागू असलेल्या वेळेनुसार सकाळी ७.०० ते दुपारी १२.१५ अशी शाळेची वेळ निश्चित करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. पालकमंत्र्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे शिक्षकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत असून, या निर्णयामुळे शालेय कामकाजाबरोबरच SIR आणि BLO संबंधीच्या जबाबदाऱ्याही अधिक प्रभावीपणे पार पाडता येतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या सकारात्मक हस्तक्षेपाबद्दल शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी सेना, जळगाव यांनी पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांचे आभार व्यक्त केले आहेत.

---

## मुसळधार पावसामुळे रायगड जिल्ह्यातील सर्व शाळांना सुट्टी

### जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

**जन सम्राट टाईम्स**

**रायगड| प्रतिनिधी:** भारतीय हवामान विभागाने रायगड जिल्ह्यासाठी जारी केलेल्या रेड अलर्टच्या पार्श्वभूमीवर आणि जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सोमवार, ६ जुलै २०२६ रोजी जिल्ह्यातील सर्व शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला असून जिल्हाधिकारी कार्यालयाने याबाबत अधिकृत आदेश जारी केला आहे. हवामान विभागाने ५ ते ७ जुलै या कालावधीत रायगड जिल्ह्यात काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार, तर तुरळक ठिकाणी अत्यंत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. गेल्या पाच दिवसांपासून जिल्ह्यात सातत्याने पाऊस सुरू असून अनेक भागांमध्ये पाणी साचणे, रस्त्यांवर वाहतूक विस्कळीत होणे तसेच नदी-नाल्यांच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्या, प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा सोमवारसाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे हजारो विद्यार्थ्यांना आज शाळेत जावे लागणार नाही. मात्र, सुट्टी जाहीर करण्यात आली असली तरी सर्व मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेत शाळेत उपस्थित राहणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत स्थानिक प्रशासनाला आवश्यकतेनुसार मदत व सहकार्य करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या



संततधार पावसामुळे परिस्थितीवर प्रशासनाचे बारकाईने लक्ष आहे. तहसीलदार आणि संबंधित इन्सिडंट कमांडर यांनी अतिवृष्टीचा संभाव्य धोका लक्षात घेऊन शाळांना सुट्टी जाहीर करण्याची शिफारस जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती. त्यानंतर परिस्थितीचा आढावा घेऊन हा निर्णय घेण्यात आला. हवामान विभागाने ५ ते ७ जुलै या कालावधीत रायगड जिल्ह्यात काही ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार, तर तुरळक ठिकाणी अत्यंत मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. गेल्या पाच दिवसांपासून जिल्ह्यात सातत्याने पाऊस सुरू असून अनेक भागांमध्ये पाणी साचणे, रस्त्यांवर वाहतूक विस्कळीत होणे तसेच नदी-नाल्यांच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान, जिल्हा प्रशासनाने पालक आणि नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. अनेक भागांमध्ये पाणी साचणे, रस्त्यांवर वाहतूक विस्कळीत होणे तसेच नदी-नाल्यांच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.अतिआवश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, नदी-नाले, धबधबे आणि पूरग्रस्त भागांपासून दूर राहावे तसेच प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सततच्या पावसामुळे कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तातडीने स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधण्याचेही आवाहन करण्यात आले असून जिल्हा प्रशासन परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

---

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

## बहिणाबाईंचे जीवनतत्त्वज्ञान भावी पिढीसाठी प्रेरणेचे विद्यापीठ : पालकमंत्री

### कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण; अत्याधुनिक सभागृहाचे उद्‌घाटन

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात रविवारी कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण तसेच ए.पी.जे. अब्दुल कलाम भवनातील अत्याधुनिक सुसज्ज सभागृहाचे उद्‌घाटन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. विजय एल. माहेश्वरी होते. यावेळी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, विद्यापीठ सल्लागार समितीचे अध्यक्ष अशोक जैन, महापौर दीपमाला काळे, आमदार सुरेश भोळे, जिल्हाधिकारी रोहन घुगे,



जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. उद्‌घाटनप्रसंगी बोलताना पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, "कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे जीवन आणि साहित्य हे संपूर्ण समाजाला दिशा देणारे आहे. विद्यापीठात उभारलेला हा अर्धाकृती पुतळा केवळ स्मारक नसून भावी पिढीसाठी प्रेरणेचा दीपस्तंभ ठरेल. बहिणाबाईंचे जीवनतत्त्वज्ञान हेच एक प्रेरणेचे विद्यापीठ आहे." यावेळी त्यांनी बहिणाबाईंची प्रसिद्ध कविता "माझी माय सरस्वती माले शिकवते बोली" सादर करत मातृभाषा, शिक्षण आणि संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच विद्यापीठात 'बाळासाहेब ठाकरे सेंटर फॉर एक्सलन्स' उभारण्यासाठी शासनाकडून आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. विद्यार्थी वसतिगृहाची इमारत विद्यापीठाकडे हस्तांतरित करण्यासाठी प्रशासनामार्फत आवश्यक कार्यवाही केली जाईल, असेही त्यांनी सांगितले. बहिणाबाईंच्या जीवनचरित्रावरील संशोधन, शेती आणि विशेषतः केळी संशोधनाशी संबंधित उपक्रमांना शासनाकडून सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाहीही पालकमंत्र्यांनी दिली. वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी बहिणाबाईंचा पुतळा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरेल, असे सांगत खानदेशातील बोलीभाषांचे संवर्धन व संशोधन होण्याची गरज व्यक्त केली. विद्यापीठ सल्लागार समितीचे अध्यक्ष अशोक जैन यांनी जैन इरिगेशनच्या बहिणाबाई ट्रस्ट आणि विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने बहिणाबाईंच्या साहित्याचा जागतिक स्तरावर प्रचार-प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती दिली. जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी बहिणाबाईंच्या जीवनातून प्रतिभेला कोणत्याही सामाजिक अथवा शैक्षणिक मर्यादा अडथळा ठरत नाही, हा संदेश मिळतो, असे सांगितले. तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अहिराणी भाषेच्या भाषांतरासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती दिली. यावेळी 'केळी निर्यात व्यवस्थापन' या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या माहितीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच विद्यापीठाच्या सिलेज प्रकल्पांतर्गत विकसित करण्यात आलेल्या 'सिलेज निट्रो बॅक' आणि 'सिलेज ब्ल्यूटी' या उत्पादनांच्या माहितीपत्रकांचेही प्रकाशन करण्यात आले.

### एआय प्रशिक्षण अभियानाचा शुभारंभ

कार्यक्रमादरम्यान विद्यापीठ आणि आयआयटी चेन्नई यांच्यातील कराराअंतर्गत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) प्रशिक्षण अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. बहिणाबाईंच्या अर्धाकृती पुतळा उभारणीसाठी योगदान देणाऱ्या समिती सदस्यांसह सभागृह उभारणीत योगदान दिलेल्या अभियंते, वास्तुविशारद आणि कंत्राटदारांचा सत्कारही करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांनी केले. सूत्रसंचालन खेमराज पाटील आणि प्रा. वीणा महाजन यांनी केले, तर आभार प्रदर्शन कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी मानले.

# अ‍ॅट्रॉसिटी प्रकरणांमध्ये दोषसिद्धी वाढविण्यावर भर द्या!

## नियमांच्या अंमलबजावणीसाठी गठित राज्यस्तरीय उच्चाधिकार दक्षता व नियंत्रण समितीची बैठक

जन सम्राट टाईम्स

**पारोळा/प्रतिनिधी:** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज विधानभवन, मुंबई येथे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम तथा नियमांच्या अंमलबजावणीसाठी गठित राज्यस्तरीय उच्चाधिकार दक्षता व नियंत्रण समितीची बैठक पार पडली. अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अर्थात 'अ‍ॅट्रॉसिटी' कायद्याअंतर्गत दाखल गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यात यावे. तसेच या कायद्यासारख्या विशेष कायद्यांमध्ये सरकारी वकिलांमार्फत दोषसिद्धी वाढविण्यासाठी करण्यात आलेल्या कार्याचा उल्लेख त्यांच्या मूल्यमापनात करण्यात यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, भारतीय न्याय संहितेमध्ये कुठल्याही खटल्यात दोन वेळा तडजोड किंवा समायोजन करण्याची तरतूद आहे. राज्यातही या तरतुदींवर आधारित कायद्यात सुधारणा करण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करावा. विशेष कायद्यांमध्येही दोन वेळा समायोजनाचीच तरतूद असावी, जेणेकरून अशा गुन्ह्यांमधील आरोपी सुटणार नाहीत. राज्यातील ज्या जिल्ह्यांमध्ये अ‍ॅट्रॉसिटीचे गुन्हे जास्त आहेत, त्या ठिकाणी जलदगती न्यायालये उभारावीत. या न्यायालयांच्या माध्यमातून खटल्यांच्या निकालांना गती मिळेल. त्यामुळे पीडितांना गुन्हा दाखल झाल्यापासून कमी कालावधीत न्याय मिळू शकेल असे हि त्यांनी सांगितले गृह विभागाच्या मार्वल संस्थेच्या माध्यमातून अ‍ॅट्रॉसिटी गुन्ह्यांमधील दोषसिद्धी न होण्याची कारणे शोधून, गुन्हा दाखल झाल्यापासून ते न्यायालयामध्ये खटला दाखल होईपर्यंत विशिष्ट कार्यपद्धती तयार करण्यात यावी. यामध्ये तकलादू पुरावे, 'चेन ऑफ इव्हेंट्स', साक्षीदार फितूर होणे या बाबींचा अभ्यास करून ही विशिष्ट कार्यपद्धती तयार करण्यात यावी. या कायद्याअंतर्गत तपास अधिकारी हा उपविभागीय पोलीस अधिकारी असतो. त्यामुळे राज्यभरात घेण्यात येणाऱ्या कार्यशाळांमध्ये प्रामुख्याने उपविभागीय पोलीस अधिकारी स्तरावरील प्रशिक्षण घेण्यात यावे. या कायद्याअंतर्गत दाखल खटल्यांच्या न्यायालयीन सुनावणीचे भारतीय न्याय संहितेतील तरतुदीनुसार व्हिडिओ चित्रीकरण करावे, जेणेकरून साक्षीदार फितूर होण्याचे प्रमाण कमी होईल, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात सोलापूर, अहिल्यानगर, परभणी, नांदेड व यवतमाळ जिल्ह्यांमध्ये अ‍ॅट्रॉसिटी कायद्याअंतर्गत दाखल होणाऱ्या गुन्ह्यांचे प्रमाण जास्त असण्यामागील कारणे पोलीस यंत्रणेने शोधावीत. याबाबत अधिक सखोल चौकशी करून गुन्ह्यांचा अभ्यास करत अहवाल सादर करावा. कुठेही खोटे गुन्हे असल्यास, तपासाअंती ते दाखल करण्यात येऊ नयेत. या कायद्याअंतर्गत दाखल खटल्यांच्या सुनावणीदरम्यान खून, बलात्कार, दरोडे आदी गंभीर गुन्ह्यांतील साक्षीदारांचे संरक्षण करावे, त्यासाठी साक्षीदार संरक्षण कार्यक्रम राबविण्यात यावा. जिल्हास्तरावर कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करत सरकारी वकिलांशी संवाद व समन्वय वाढविण्यात यावा. या कायद्याच्या अंमलबजावणीशी संबंधित सर्व यंत्रणांच्या कार्यशाळा घेऊन त्यांना प्रशिक्षित करावे. तसेच कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरावर मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली आणि पोलीस महासंचालक यांच्या अध्यक्षतेखाली वर्षातून सहा महिन्यांच्या अंतराने बैठक आयोजित करण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.



### आर्थिक मदत व हेल्पलाइनविषयी माहिती:

अ‍ॅट्रॉसिटी कायद्यांतर्गत 2025-26 मध्ये 4524 पीडित व्यक्तींना आर्थिक मदत देण्यात आली आहे. यासाठी ₹53.57 कोटी निधी खर्च करण्यात आला आहे. तसेच 2026-27 मध्ये आतापर्यंत 2081 पीडित व्यक्तींना ₹27.40 कोटी मदत करण्यात आली आहे. अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत 14566 या हेल्पलाईनवरही तक्रारी स्वीकारण्यात येतात. या हेल्पलाईनवर प्राप्त 282 तक्रारी 1 जून 2026 पूर्वी निकाली काढण्यात आल्या आहेत असे मुख्यमंत्री यांनी सांगितले, सदरच्या बैठकीस खासदार हेमंत सवरा, समितीमधील आमदार तसेच सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी सादरीकरण केले. यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (गृह) मनीषा म्हैसकर, पोलिस महासंचालक सदानंद दाते, प्रधान सचिव (विधि व न्याय) दिलीप घुमरे, सचिव (आदिवासी विकास) विजय वाघमारे, अपर पोलिस महासंचालक (नागरी हक्क संरक्षण) अश्वती दोरजे, समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ आदी उपस्थित होते.



जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# कर्जत – खोपोली लोकल सेवा बंद!

## पावसाचा रेल्वे वाहतुकीला फटका

जन सम्राट टाईम्स

**मुंबई । प्रतिनिधी :** मुंबई आणि उपनगरांसह घाट परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. भूस्खलन, रुळांखालची खडी वाहून जाणे आणि रेल्वे मार्गांवर पाणी साचल्याने अनेक रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या असून काही गाड्या पर्यायी मार्गाने वळविण्यात आल्या आहेत. मध्य रेल्वेची उपनगरीय सेवा उशिराने धावत आहेत. तर, कर्जत – खोपोली लोकल सेवा बंद करण्यात आली आहे. मध्य रेल्वेच्या कर्जत–लोणावळा दक्षिण-पूर्व घाट विभागात ठाकूरवाडी आणि मंकी हिल लूप केबिन दरम्यान मुसळधार पावसामुळे भूस्खलन झाले. तसेच खंडाळा–मंकी हिलदरम्यान मध्य मार्गावरही दरड कोसळल्याने तिन्ही मार्गांवरील वाहतुकीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे अनेक मेल-एक्सप्रेस रद्द करण्यात आल्या असून काही रेल्वेगाड्या पर्यायी मार्गाने वळविण्यात आल्या आहेत. काही गाड्या अंशतः रद्द करण्यात आल्या आहेत तर काहींच्या वेळापत्रकातही बदल करण्यात आला आहे. याचदरम्यान, मुसळधार पावसामुळे कर्जत ते खोपोली मार्गावर रेल्वे रुळांखालचा खडी (बॅलेस्ट) वाहून गेल्याने या मार्गावरील लोकल सेवा तात्पुरती थांबवण्यात आली आहे. दक्ष कर्मचाऱ्यांनी वेळेत ही बाब निदर्शनास आणून




दिल्यानंतर सुरक्षेच्यादृष्टीने हा निर्णय घेण्यात आला. रेल्वे अभियंते आणि देखभाल पथके घटनास्थळी पोहचून मार्ग पूर्ववत करण्यासाठी युद्धपातळीवर काम करत आहेत.पश्चिम रेल्वेवरही मुसळधार पावसाचा मोठा परिणाम झाला आहे. विरार ते नालासोपारा आणि वसई रोड ते विरार स्थानकांदरम्यान रुळांवर पाणी साचल्याने लोकल वाहतूक विस्कळीत झाली आहे.

### शहरातील अनेक भाग जलमय

विरार ते नालासोपारा दरम्यान धीम्या मार्गावरील लोकल सेवा प्रभावित झाल्याने लोकल जलद मार्गावरून चालविण्यात येत आहेत. लोकल सुमारे १५ ते २० मिनिटे उशिराने धावत आहेत. पश्चिम रेल्वे प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, गेल्या दोन तासांत पालघर परिसरात या पावसाचे पाणी वसई–विरार परिसराकडे वाहून येत असल्याने रेल्वे मार्ग आणि स्थानक परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले आहे. शहरातील नाले आणि गटारे ओसंडून वाहत असून नालासोपारा शहरातील अनेक भाग जलमय झाले आहेत.

# पाण्याच्या हौदात पडून ३ वर्षीय चिमुकलीचा मृत्यू

जन सम्राट टाईम्स



**नशिराबाद । प्रतिनिधी :** प्रनशिराबाद येथील भवानीनगर परिसरात खेळत असताना पाण्याच्या हौदात पडून तीन वर्षीय चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून, इंगळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मृत चिमुकलीचे नाव आकांक्षा प्रवीण इंगळे (वय ३) असे असून, ती भवानीनगर, नशिराबाद येथील रहिवासी होती. मिळालेल्या माहितीनुसार, आकांक्षा घराजवळ खेळत असताना तिचा पाय घसरून जवळील पाण्याच्या हौदात पडली. लहान वयामुळे तिला स्वतःचा बचाव करता आला नाही आणि या दुर्दैवी अपघातात तिचा मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत उशीर झाला होता. या घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून,अकाली निधनाने कुटुंबीयांवर दुःखाचा मोठा आघात झाला आहे. भवानीनगर परिसरात खेळत असताना पाण्याच्या हौदात पडून तीन वर्षीय चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून, इंगळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर उघडे हौद, विहिरी, पाण्याच्या टाक्या आणि जलसाठ्यांच्या ठिकाणी आवश्यक सुरक्षा उपाययोजना करणे गरजेचे असल्याची भावना या घटनेनंतर नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# कोणत्याही रुग्णाला उपचार नाकारता येणार नाहीत; नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रुग्णालयांवर कारवाई

## महात्मा फुले योजनेच्या आढावा बैठकीत प्रकाश आबिटकर यांचे निर्देश

जन सम्राट टाईम्स

**मुंबई (प्रतिनिधी):** राज्यातील कोणत्याही पात्र रुग्णाला प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत उपचार नाकारता येणार नाहीत. नियमांचे उल्लंघन करून रुग्णांना उपचारांपासून वंचित ठेवणाऱ्या सरकारी किंवा खासगी रुग्णालयांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिला. प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेशी संलग्न सरकारी व खासगी रुग्णालयांच्या प्रतिनिधींसोबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीला



महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अण्णासाहेब चव्हाण, ठाणे परिमंडळाचे उपसंचालक डॉ. अशोक नंदापूरकर तसेच विविध रुग्णालयांचे प्रतिनिधी आणि आरोग्य योजनांचे अधिकारी उपस्थित होते. आबिटकर म्हणाले की, शासनाच्या सार्वजनिक आरोग्य योजनांचा उद्देश गरीब आणि गरजू नागरिकांना दर्जेदार व मोफत उपचार उपलब्ध करून देणे हा आहे. त्यामुळे मूळ रेशन कार्ड नसणे किंवा इतर किरकोळ कागदपत्रांच्या कारणास्तव कोणत्याही रुग्णाला उपचार नाकारू नयेत. अशा वेळी डिजिटल रेशन कार्ड पडताळणीसारख्या पर्यायांचा वापर करून तातडीने उपचार सुरू करावेत. कागदपत्रे, मंजुरी प्रक्रिया किंवा तांत्रिक अडचणींमुळे रुग्णांना त्रास होऊ नये, यासाठी रुग्णालय समन्वयकांनी सक्रिय भूमिका बजावावी. रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना आवश्यक मार्गदर्शन करून उपचार प्रक्रिया अधिक सुलभ करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. आरोग्यमंत्री आबिटकर यांनी सार्वजनिक आरोग्य योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तज्ज्ञ समित्यांच्या नियमित बैठका घेण्याच्या सूचना दिल्या. तसेच प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेची माहिती राज्यातील प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचविण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. बैठकीत सार्वजनिक आरोग्य योजना अधिक प्रभावी, पारदर्शक आणि रुग्णकेंद्रित करण्यावर विशेष भर देण्यात आला.

# नशिराबाद वाचनालयाची वार्षिक सभा उत्साहात

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद । प्रतिनिधी :** नशिराबाद येथील तालुका 'ब' दर्जाचे आणि ऐतिहासिक वारसा लाभलेले सार्वजनिक वाचनालयाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. सभेत संस्थेच्या वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेण्यात आला तसेच आगामी वर्षाच्या नियोजनासंदर्भात विविध महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रमोद आमोदकर होते. व्यासपीठावर कार्याध्यक्ष जनार्दन शामराव माळी आणि सचिव अ‍ॅड. प्रदीप देशपांडे उपस्थित होते. प्रारंभी डॉ. आमोदकर यांनी उपस्थितांचे स्वागत करून सभेचा उद्देश स्पष्ट केला. सभेच्या सुरुवातीला मागील वर्षात शैक्षणिक,





सामाजिक व राजकीय क्षेत्रातील दिवंगत मान्यवरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर कार्याध्यक्ष जनार्दन माळी यांनी संस्थेच्या वर्षभरातील उपक्रमांचा आणि प्रगतीचा सविस्तर अहवाल सादर केला. यावेळी संस्थेचा वार्षिक जमा-खर्चाचा अहवाल तसेच आगामी वर्षाचे अंदाजपत्रक सभेपुढे मांडण्यात आले. त्यास उपस्थित सभासदांनी सर्वानुमते मंजुरी दिली. वाचनालय अधिक समृद्ध करण्याच्या दृष्टीने नवीन पुस्तके, मासिके, पाक्षिके आणि दैनिकांची खरेदी करण्याबाबत वाचकांनी विविध सूचना मांडल्या. उपस्थित सदस्यांच्या समस्या व अडचणींवरही सविस्तर चर्चा करून त्यांचे निराकरण करण्यात आले. तसेच आगामी कालावधीसाठी लेखापरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली. सभेचे सूत्रसंचालन प्रा. व्ही. बी. कोष्टी यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. प्रमोद आमोदकर यांनी केले. या बैठकीस वाचनालयाचे पदाधिकारी, सभासद आणि वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सभेत संस्थेच्या वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेण्यात आला तसेच आगामी वर्षाच्या नियोजनासंदर्भात विविध महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रमोद आमोदकर होते. व्यासपीठावर कार्याध्यक्ष जनार्दन शामराव माळी आणि सचिव अ‍ॅड. प्रदीप देशपांडे उपस्थित होते. प्रारंभी डॉ. आमोदकर यांनी उपस्थितांचे स्वागत करून सभेचा उद्देश स्पष्ट केला. सभेच्या सुरुवातीला मागील वर्षात शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील दिवंगत मान्यवरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर कार्याध्यक्ष जनार्दन माळी यांनी संस्थेच्या वर्षभरातील उपक्रमांचा आणि प्रगतीचा सविस्तर अहवाल सादर केला.

# अतिवृष्टीमुळे पनवेल महापालिका अलर्ट!

## ४३५ नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर

जन सम्राट टाईम्स

**पनवेल | प्रतिनिधी:** पनवेल महानगरपालिका क्षेत्रात गेल्या चार-पाच दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन पूर्णपणे सतर्क झाले आहे. संभाव्य पूरस्थिती आणि सखल भागातील पाणी साचण्याचा धोका लक्षात घेऊन बाधित नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी विविध उपाययोजना युद्धपातळीवर राबविण्यात येत आहेत. महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत ४३५ नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात आले असून त्यांच्यासाठी तात्पुरत्या निवारा केंद्रांमध्ये सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

अतिवृष्टीमुळे पाणी साचणाऱ्या भागांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. पनवेलमधील पटेल मोहल्ला आणि कच्ची मोहल्ला परिसरातील भारतनगर झोपडपट्टीतील १४९ नागरिकांना उर्दू शाळेत, २११ नागरिकांना कोळीवाडा शाळेत, तर एचओसी कॉलनी आदिवासी वाडीतील ७५ नागरिकांना क्रीडा संकुलात सुरक्षितपणे स्थलांतरित करण्यात आले आहे. स्थलांतरित नागरिकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी महापालिकेच्या भांडार विभागामार्फत चहा, बिस्किटे, नाश्ता, जेवण, पिण्याचे स्वच्छ पाणी तसेच इतर जीवनावश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. याशिवाय मुख्य वैद्यकीय



अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या सूचनेनुसार सर्व नागरिकांची आरोग्य तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहेत. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त, संबंधित उपायुक्त, कामोठे प्रभाग अधिकारी दशरथ भंडारी, पनवेल प्रभाग प्रभारी अधिकारी राजेश डोंगरे तसेच मुख्य निरीक्षक अरुण कांबळे हे सातत्याने निवारा केंद्रांना भेट देत असून नागरिकांच्या अन्न, आरोग्य आणि सुरक्षिततेची प्रत्यक्ष पाहणी करत आहेत. दरम्यान, सखल भागांमध्ये साचलेल्या पाण्याचा वेगाने निचरा करण्यासाठी महापालिकेने विशेष मोहीम सुरू केली आहे. आयुक्त मंगेश चितळे यांनी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना २४ तास सतर्क राहण्याचे निर्देश दिले असून, नाले आणि जलवाहिन्यांमधील अडथळे हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. विविध ठिकाणी महापालिकेचे कर्मचारी सतत कार्यरत असून पाणी साचू नये यासाठी तातडीने उपाययोजना केल्या जात आहेत. महापालिकेच्या चारही प्रभागांतील परिस्थितीवर नियंत्रण कक्षामार्फत सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# आज मुंबईसह ठाणे, रायगड, पालघर, नवी मुंबईतील शाळांना सुट्टी

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य; हवामान विभागाच्या इशाऱ्यानंतर प्रशासनाचा निर्णय

जन सम्राट टाईम्स

**मुंबई । प्रतिनिधी:** राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर आणि भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अतिवृष्टीच्या इशाऱ्यानंतर आज (सोमवार, ६ जुलै २०२६) मुंबई महानगरासह ठाणे, रायगड, पालघर, नवी मुंबई आणि कल्याण-डोंबिवली परिसरातील सर्व शाळा आणि काही ठिकाणी महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने संबंधित जिल्हाधिकारी आणि स्थानिक प्रशासनाने हा निर्णय घेतला असून पालकांनीही अनावश्यक प्रवास टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गेल्या काही दिवसांपासून मुंबई, ठाणे, रायगड, पालघर आणि कोकण पट्ट्यात मुसळधार पाऊस सुरू आहे. अनेक ठिकाणी सखल भाग जलमय झाले असून रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतुकीवर परिणाम झाला आहे. काही भागांत झाडे कोसळणे, भिंती ढासळणे आणि घरांमध्ये पाणी शिरण्याच्या घटनाही घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून शैक्षणिक संस्था बंद



ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. भारतीय हवामान विभागाने ठाणे जिल्ह्यासाठी ऑरेंज अलर्ट, तर मुंबई व रायगडसह किनारपट्टी भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी, बालवाडी, प्राथमिक व माध्यमिक शाळांना आज सुट्टी देण्यात आली आहे. मुंबई महानगरपालिकेनेही विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देत मुंबईतील सर्व शासकीय, महानगरपालिका आणि खासगी शाळा तसेच महाविद्यालयांना आज सुट्टी जाहीर केली आहे. मात्र, शासकीय व खासगी कार्यालये नियमित सुरू राहणार असून नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातही रेड अलर्टच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व अंगणवाडी, शाळा आणि महाविद्यालये बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. तर पालघर जिल्ह्यातही अतिवृष्टीच्या शक्यतेमुळे शैक्षणिक संस्थांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. दरम्यान, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आणि नवी मुंबई महानगरपालिकेनेही आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांना आज सुट्टी जाहीर केली आहे. संबंधित शाळांना पालक आणि विद्यार्थ्यांपर्यंत ही माहिती तातडीने पोहोचविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### युद्धकलेची प्रात्यक्षिके :

प्रशासनाने नागरिकांना नदी, नाले, समुद्रकिनारे आणि पाणी साचलेल्या भागांपासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे. तसेच हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करून आवश्यक ती खबरदारी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. बचाव आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा पूर्णपणे सज्ज ठेवण्यात आली असून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306